# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

---

दिनांक ०९.१०.२०२६ शुक्रवार

(कामगिरी)

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–**

दिनांक ०८.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०४ केसेसमध्ये ०४ ईसमावर कारवाई करून एकुण १२,४२०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. जुगार कायद्यान्वये ०१ केसमध्ये ०१ ईसमावर कारवाई करून एकुण ५२५/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. दिनांक ०८.१०.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०९.१०.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०४ इसमावर कारवाई करण्यात आलेली आहे.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ४८ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये २५ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये १३१ केसेस, ऑन रोड पार्कीग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २९२ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये १९ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये १०८ केसेस, ड्रायव्हींग विदाऊन युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ११ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ४६ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०४ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये २० केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये २३ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १,३०० केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे ०९ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये ३७ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,९८६ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ९,६४,१५०/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) यशोधरानगर पोलीसांची कामगीरी :– वाहनचोरीचे ०२ गुन्हयातील पाहिजे आरोपीस अटक करुन, घरफोडी व वाहनचोरीचे इतर ०४ गुन्हे उघडकीस.**

दिनांक ०४.०९.२०२६ ते दिनांक ०६.०९.२०२६ चे ०८.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, प्लॉट नं. २०८, गल्ली क्र. २१, यादवनगर, नागपुर येथे राहणाऱ्या फिर्यादीच्या आई यांनी त्यांचे राहते घराचे मुख्य दाराला कुलुप लावुन, पुणे येथे बहिणीकडे गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे आईचे घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडून, आत प्रवेश करुन, बेडरुममधील लोखंडी कपाटातील रोख ३,०००/–रू. तसेच, सोन्या–चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती २८,८००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी मिलींद जगन मेश्राम वय ४८ वर्ष रा. ह.मु. २ए/१०७, डब्ल्युसीएल कॉलनी, उमरेड यांनी

दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा. न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान यशोधरानगर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास केला. तसेच, त्यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, आरोपी विक्की उर्फ बिट्टू याने शहरात काही ठिकाणी घरफोडी व वाहनचोरी केली आहे व तो ०२ गुन्हयात पाहिजे आरोपी असुन तो वनदेवीनगर झोपडपट्टी परिसरात फिरत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, आरोपीचा नमुद ठिकाणी शोध घेतला असता, प्राप्त वर्णनाचा इसम वनदेवी नगर झोपडपट्टी परिसरातील रेल्वे पटरीजवळ दिसुन आला. त्याचेजवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळून जाण्याचे तयारीत असता, त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव विक्की उर्फ बिट्टु योगेश डेहरीया वय २४ वर्षे रा. घमासान चौक, जबलपुर, मध्यप्रदेश ह.मु. नाईक तलाव पोलीस चौकीजवळ, दुसरी गल्ली, पाचपावली, नागपुर असे सांगितले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, तो पोलीस ठाणे शांतीनगर व हुडकेश्वर येथे दाखल प्रत्येकी ०१ चोरीचे गुन्हयात पाहिजे आरोपी असल्याचे दिसुन आले. आरोपीस वर नमुद गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता, त्याने वर नमुद घरफोडीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. तसेच वर नमुद गुन्हयाव्यतिरिक्त पोलीस ठाणे यशोधरानगर हद्यीत इतर ठिकाणी ०१ वाहनचोरी, शांतीनगर हद्यीमध्ये ०१ वाहनचोरी व हुडकेश्वर हद्यीमध्ये ०१ वाहनचोरी असे एकुण ०४ घरफोडी व वाहनचोरीचे गुन्हे केल्याचे सांगितले. आरोपीचे ताब्यातुन चांदीची ०२ नाणी, हिरो सीडी डिलक्स मोटार सायकल क्र. एमएच ४९ के ८५२९, सुझुकी जिक्सर मोटार सायकल क्र. एमएच ३१ एफटी ६८४७ व बजाज एनएस १६० मोटार सायकल क्र. एमएच ४९ डीबी ८१७६ असा एकुण २,३९,५००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली असुन, पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त, मा. श्री वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमणा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. युनुसचांद शेख, पोउपनि. निळकंठ नन्नावरे, पोवहा. गणेश गुप्ता, रवि आहीर, पोअं. अमोल भेंडेकर, लक्ष्मण पडवाल, रितेश दुधे, अक्षय कुळसंगे, अमोल आप्तुलकर यांनी केली.



**<u>३) गुन्हेशाखा युनिट क्र. ४ पोलीसांची कामगीरी :— घरफोडीचा गुन्हा उघडकीस.</u>**

दिनांक २६.०९.२०२६ चे ०७.३० वा. ते दिनांक ०६.१०.२०२६ चे ०५.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत प्लॉट क्र. १२, साईकृपा सोसायटी, म्हाडा कॉलोनीजवळ, नरेंद्र नगर, नागपूर येथे राहणारे फिर्यादी धवल नरेंद्र कडू, वय ४२ वर्ष हे आपले राहते घराला कुलुप लावुन कामानिमित्य मुंबई येथे गेले असता,

कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराला लावलेले सि.सि.टी.व्हि. बंद करून, घराचे मुख्य दाराचे कडी कोंडा व कुलूप तोडून घराचे आंत प्रवेश करून, कपाटातील सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने व वस्तु किंमती ४,४८,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ४ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, गुन्ह्यातील आरोपी १) पवनकुमार उर्फ आलु राजेंद्र भोसले वय ३३ वर्षे, रा. नाईक नगर, प्लॉट क्र. ११४, एनआयटी गार्डनजवळ, पंढरीनाथ वाघमारे यांचे घरी किरायाने, अजनी, नागपुर २) संदेश उर्फ संघपाल उर्फ संध्या राजु पंडागळे वय ३७ वर्षे, रा. सुदामनगर, संगती बुध्द विहाराचे बाजुला, अंबाझरी, नागपूर यांना सुदामनगरी, अंबाझरी येथुन ताब्यात घेवुन, वर नमुद गुन्हयासंबंधाने विचारपूस केली असता, त्यांनी नमुद घरफोडीचा गुन्हा संगनमताने केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन एक निळया रंगाची विनानंबर प्लेटची ॲक्टिवा मोपेड, ०२ मोबाईल फोन व चांदीचे वेगवेगळे दागिने तथा वस्तु वजनी ४१५ ग्राम असा एकुण किंमती १,८४,९००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव बेलतरोडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. श्रीमती संजिवनी थोरात, सपोनि. वैभव बारंगे, पोउपनि. जितेशाचारी आरवेल्ली, सफौ शेख नजीर, पोहवा. पुरुषोत्तम जगनाडे, अभिषेक शनिवारे, अजय यादव, भगवती ठाकुर, देवेंद्र नवघरे, पोअं. व्यंकटेश काटवले, गोविंद देशमुख व चापोअं लक्ष्मण कळमकर यांनी केली.






**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे एमआयडीसी :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक ०९.१०.२०२६ चे ०२.४० वा. चे सुमारास, एमआयडीसी पोलीसांचे तपास पथक हे हद्दपार इसमांचे शोधार्थ पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांनी भिमनगर, गायधने किराणा दुकानाजवळ राहणारा हद्दपार इसम राहुल गौतम राऊत वय २५ वर्ष यास त्याचे राहते घरी चेक केले असता, तो घरी मिळुन आला. आरोपीस ताब्यात घेऊन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०७/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने राहते घरी समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोअं. किशोर इंगळे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोउपनि. शशिकांत तायडे यांनी पोलीस

ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे खापरखेडा :– घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०१.१०.२०२६ चे ०९.३० वा. ते दिनांक ०८.१०.२०२६ चे ०५.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत वार्ड क्र. २, दहेगाव रंगारी, हनुमान मंदीरजवळ, नागपूर येथे राहणारे फिर्यादी नितेश नत्थुजी केळवदे वय ५२ वर्ष हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह सासुरवाडीला पारडी, कळमेश्वर येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कडी कोंडा व कुलूप तोडून, घराचे आंत प्रवेश करून, बेडरुममधील लोखंडी कपाटातील व किचनमधील लोखंडी आलमारीचे लॉकर तोडून त्यामधील सोन्याचे वेगवेगळे दागिने एकुण किंमती १,२०,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे खापरखेडा येथे पोउपनि. अमोल पाटील ९२०९९२३५४४ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे सक्करदरा :–</u>** दिनांक ०८.१०.२०२६ चे ०८.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत, मोठा ताजबाग परिसरातील दुधिया कुंवाजवळ एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णन–रंग–सावळा, बांधा–सडपातळ, उंची ५ फुट ८ इंच, अंगात–निळ्या रंगाचा जिन्सपॅन्ट घातलेला आहे. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे सक्करदरा येथे संपर्क साधावा.

यात्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे सक्करदरा येथे पोउपनि. सुरेश पठाडे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. ८,नागपूर | १८२२/ २००८ | कलम २९४ भा.दं.वि. | १) निलेश चुडामण जनबंधु रा. जयअंबे नगर, रामभुमी सोसायटी, सुरेश यांचे घरी किरायाने, भांडेवाडी, नागपूर २) शेख इकबाल अगवान इस्माईल अगवान रा. प्लॉट क्र. २७८, जयदुर्गा नगर, भांडेवाडी, पारडी, नागपूर | २९.१०.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **२** | मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. ४,नागपूर | ३२४१६४४/ २००३ | कलम ३९३, ३४ भा.दं.वि. | हरीश्चंद्र प्रल्हाद बोरकर रा. महेंद्र नगर, शत्रृघ्न शेडेच्या घरी किरायाने, पाचपावली, नागपूर | १५.१०.२०२६ |
| **३** | मा. १७ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०४००६६/ १९९९ | कलम ३८५, ५०६,३४ भा.दं.वि. | १) मोहम्मद असलम अनवर कुलटक वय ६७ वर्ष रा. भानखेडा, छोटी मस्जिदजवळ, ईस्माईल अन्सारी वकीलचे घरा जवळ, तहसील, नागपूर<br>२) हाजी मोहम्मद जाबीर हुसेन वय ४२ वर्ष रा. मोमीनपुरा, हफीज बेकरीजवळ, तहसील नागपूर | १५.१०.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**